MHPU180008292014

नि. दिवाणी दावा क्र. १२७/२०१४
हनुमंत
विरुध्द
भिवा व इतर

<u>निशाणी क्र. १२५ वर आदेश</u>
(पारीत दिनांक ०२/०१/२०२५)

वादी यांनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ३ कामाबाई सिदू शिंगटे यांचे वारस दाव्यात अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी यांच्या विरुध्द निरंतर मनाई करीता दखल केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ३ कामाबाई सिदू शिंगटे या दि. ०५/१२/२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारस वादी यांनी अर्जामध्ये नमूद केले आहेत. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ३ मयत झाल्याची माहिती प्रतिवादी यांनी पुरसिस दिल्याने झालेली आहे. सदर कामी त्यांना ३५ दिवसांचा उशिर झाला असल्याकारणाने उशिर माफ होऊन प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी विनंती वादी यांनी केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्या विद्वान वकिलांनी म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत व त्याच बरोबर वादी यांच्यावर खर्च लादण्याचा आदेश पारित करण्याची विनंती केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ३ या दिनांक ०५/१२/२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांना त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी विलंब झालेला आहे. वादी यांना ३५ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येते. सदर अर्जासोबत वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी १२८ वरील यादी नुसार दाखल केले आहे. मात्र, सदर मृत्यू प्रमाणपत्रामध्ये मयताचे नाव शिंगटे सखुबाई सिदू असे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाव्यातील त्यांच्या नावा प्रमाणे नसल्याचे दिसून येते. सदर नावा मध्ये

असलेल्या साधर्मबाबत वादी यांनी कोणताही पुरावा न्यायालयासमोर दाखल केलेला नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करणे योग्य होणार नाही. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. वादी यांचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2025.01.04 11:49:20 +0530

दिनांक- ०२/०१/२०२५.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 02/01/2025. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 02/01/2025. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 04/01/2025. |